समादेशक,
भा.रा.ब.- ३, कोल्हापूर.
☎ दुरध्वनी : ०२३१-२६५३४६६
ई-मेल :
comdt.irb३.kop@mahapolice.gov.in

समादेशक,
भारत राखीव बटालियन-३ कोल्हापूर
जुने पोलीस अधीक्षक कार्यालय,
कसबा बावडा, कोल्हापूर पिन-४१६००३

जा.क्र. :- भाराब-३/ आस्था-१/ पोलीस भरती २०२२-२३ / प्रेस नोट/२०२४/ 3023 दि. /०७/२०२४ 10 JUL 2024

## प्रेस नोट

भारत राखीव बटालियन-३ ( राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १६), कोल्हापूर येथील रिक्त असणा-या १८२ सशस्त्र पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया सोमवार दि. ०१.०७.२०२४ रोजी पासून पोलीस परेड ग्राऊंड, पोलीस हेडक्वॉर्टर, कसबा बावडा, कोल्हापूर येथे सुरु झाली आहे. दिनांक १३.०७.२०२४ रोजी बोलविण्यात आलेल्या माजी सैनिक उमेदवारांना याव्दारे कळविणेत येते की, त्यांनी त्यांचे ओळखपत्रासह शुक्रवार दिनांक १२.०७.२०२४ रोजी सकाळी ठिक ०७:०० वा मैदानी चाचणी करिता पोलीस परेड ग्राऊंड, पोलीस हेडक्वॉर्टर, कसबा बावडा, कोल्हापूर च्या प्रवेशद्वाराजवळ बिनचूक उपस्थित राहावे. संबधीत उमेदवार यांची मैदानी चाचणी दिनांक १२.०७.२०२४ रोजी घेण्यात येणार आहे.

तसेच दिनांक ०१.०७.२०२४ ते १२.०७.२०२४ या कालावधीमधील मैदानी चाचणीकरीता बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना मैदानी चाचणीस येण्यास अन्य घटकात मैदानी चाचणी असल्याने अथवा पावसामुळे काही अडचण उद्‌भवली असल्यास त्यांनी दिनांक १३.०७.२०२४ रोजी सकाळी ०५.०० वाजता मैदानी चाचणीच्या तयारीने पोलीस परेड ग्राऊंड, पोलीस हेडक्वॉर्टर, कसबा बावडा, कोल्हापूर च्या प्रवेशद्वाराजवळ बिनचूक उपस्थित राहावे. सदर दिवशी उमेदवार उपस्थित न राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधीत उमेदवारावर असेल.

तसेच जर उमेदवारांना इतर काही अडचण असेल तर या कार्यालयाकडून त्याचे निरसन केले जाईल. सदर सशस्त्र पोलीस शिपाई भरती करीता सर्वप्रथम मैदानी चाचणी घेण्यात येणार आहे, आणि त्या मैदानी चाचणी मध्ये पात्र ठरल्यानंतर उमेदवारांची लेखी चाचणी घेण्यात येणार आहे.

मैदानी चाचणीकरीता उमेदवारांना कळविणेत येते की, आपणास MAHA-IT Website वरुन प्राप्त प्रवेशपत्र तसेच आधार कार्ड, फोटोग्राफ आणि आवश्यक त्या कागदपत्रांसह भरतीसाठी उपस्थित रहावयाचे आहे.

समादेशक भारत राखीव बटालियन-३ COMMANDANT INDIA RESERVE BATTALION-3 KOLHAPUR कोल्हापूर

(अमोल गायकवाड)
समादेशक,
पोलीस भरती अध्यक्ष - २०२२-२३,
भारत राखीव बटालियन-३, कोल्हापूर.